॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/५०७ दिनांक २८/१२/२०२३

## <u>परिपत्रक</u>

**प्रति,**
**मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,**
**रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय: छत्रपती श्री. शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळयानिमित्त ऋणानुबंध फाऊंडेशन द्वारा आयोजित शिवोत्सव महाप्रतियोगिते मध्ये सहभागी होणे बाबत**

संदर्भ: मा. शिक्षण संचालक (उ.शि.) महराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे जा.क्र उशिसं/मवि–१/स्वा.अ.म./२०२३/१६६६६, दिनांक २६ डिसेंबर २०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मा. शिक्षण संचालक (उ.शि.) महराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री. शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळया निमित्ताने, 'समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी व नागारीकांचा सहभाग होऊन प्रत्येकाच्या मनातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार प्रकट स्वरूपात समाजापुढे यावेत' या उद्देशाने ऋणानुबंध फाऊंडेशन या संस्थेकडून शिवोत्सव महाप्रतियोगीता आयोजित करण्यात आली आहे. सदर प्रतियोगीतेमध्ये खालीलप्रमाणे स्पर्धा आयोजित करण्यात आल्याबाबत कळविण्यात आले आहे.

१) निबंध/लेख २) कविता/गीत ३) लघुचित्रफित ४) गायन ५) वक्तृत्व
६) चित्रकला ७) छायाचित्रण ८) शिल्पकला/भित्तीचित्र

**सदर प्रतियोगिता वर्ग ४ ते ७, वर्ग ८ ते १२, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच खुल्या गटाकरिता ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहे.**

उपरोक्त महाप्रतियोगितेमध्ये एकूण १५ लाख पर्यंतची पारितोषिके देण्यात येणार असून दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ पर्यत <u>www.rfbharat.com</u> या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात प्रवेशिका स्विकारल्या जातील असे संस्थेने कळविले आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची पध्दत खलीलप्रमाणे दर्शविण्यात आली आहे.

**सहभागी होण्याची पध्दती:–**

1) Visit <u>www.rfbharat.com</u>>
2) Register yourself>
3) Login>
4) Select Competition>
5) Select Age group>
6) Upload file>

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना छत्रपती श्री. शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळया निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत उपरोक्त पध्दतीने सहभागी होऊन प्रवेशिका दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत www.rfbharat.com या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात पाठविण्याबाबत कळविण्यात यावे, ही विनंती.

टिप:— स्पर्धेत सहभागी होण्याकरिता व सविस्तर माहितीकरिता www.rfbharat.com या संकेतस्थळावर तसेच ७७२२८८००३३/७७९६६७७८८८/०७१२—३५७१६१५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.